# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकिय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्रं.-२५६५१४३ E-mail: ronagpur.dte@gmail.com

फॅक्स क्रं.- ०७१२-२५६१६६३ Web Site :- www.rdtenagpur.org.in


**अतिमहत्त्वाचे**

क्रमांक :- तंशिस/प्राकाना/शैवि/२०१४-१५/ 1987

दिनांक:- 23 JUN 2014

प्रति,

संचालक / प्राचार्य
सर्व पदवी व पदव्युत्तर संस्था व तस्सम संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :- गुणात्मक महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षणात सुधारणा करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३१ मे २०१४ रोजी झालेल्या बैठकीत झालेल्या निर्णयावर कार्यवाही करणेबाबत...**

**संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई, यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी/२०१४/४५३, दिनांक ०७ जुन २०१४ रोजीचे.**

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यांत येते की, वरील विषयाबाबत मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली सहसचिव, उपसचिव उच्च व तंत्रशिक्षण, राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगूरू व कुलसचिव, संचालक, उच्च शिक्षण/तंत्रशिक्षण यांची दिनांक ३१ मे २०१४ रोजी सकाळी ११:०० वाजता आढावा बैठक आयोजित करण्यांत आली होती. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार खालील बाबींवर कार्यवाही करण्यांबाबत कळविण्यांत येत आहे.

**१. संस्थांनी त्यांच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मंजुर, भरलेली, रिक्त पदांची माहिती, संस्थेत उपलब्ध सोयीसुविधा, तक्रार निवारणासाठी उभारलेली उपाययोजना याबद्दलची माहिती आपल्या संस्थेंच्या संकेतस्थळावर आणि संस्था ज्या विद्यापीठाशी संलग्न असेल त्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत याव्यात.**

**२. संस्थांच्या नियंत्रणासाठी व अन्य कार्यालयातील कामकाजासाठी Egovernance चा प्रभावी वापर करण्यांत यावा.**

संदर्भाधीन पत्रान्वये देण्यांत आलेल्या सूचनांनुसार केलेल्या कार्यवाहीचा तसेच या पत्रान्वये दिलेल्या सुचनांचा त्रैमासिक अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करण्यांत यावा.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.

प्रत:- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई, यांना माहितीकरीता सादर.
२. प्रोग्रामर, वेबसाईटवर प्रकाशीत करण्यासाठी.